विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम

1) महाविद्यालयीन संपत्ती, इमारत, प्रयोगशाळा इत्यादींची सुव्यवस्था तसेच स्वच्छता ठेवणे व महाविद्यालयात शांतता ठेवणे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य राहील आणि ती कायम ठेवून वृध्दींगत करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी सहकार्य करील. वरील तत्वांच्या विरोधी प्रवृत्तीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या तो भाग घेणार नाही किंवा तसे करण्यास इतरांना प्रवृत्त करणार नाही.

2) महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षेत तो भाग घेवून, पूर्ण सहकार्य करील तसेच प्राचार्याच्या पूर्व परवानगीशिवाय वर्गात किंवा परीक्षेत अनुपस्थित राहणार नाही.

3) आपले सह–विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी प्रत्येक विद्यार्थी नम्रतापूर्वक वागणूक करील आणि अश्लिल, अशिष्ट तसेच अशोभनीय वागणूक करणार नाही.

4) विद्यार्थ्यांनी साधे, निर्व्यसनी आणि कमी खर्चीय जीवन जगले पाहीजे. विशेषतः महाविद्यालयीन किंवा वसतीगृहाच्या किंवा वसतीगृहाच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या मादक द्रव्याचे सेवन सर्वथा वर्ज्य राहील. विद्यार्थ्यांनी भडक वेशभुषा करुन त्यांच्या विलासीवृत्तीचे महाविद्यालयात प्रदर्शन करु नये.

5) विद्यार्थ्यांना काही अडचणी असल्यास त्या त्यांचे शिक्षक, प्राचार्यासमोर निर्धारीत मार्गांनी आणि शांततेने मांडून आपली मते व्यक्त करावीत.

6) आंदोलन, हिंसा किंवा दहशत इत्यादी मार्गाने कोणत्याही प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी करु नये.

7) विद्यार्थी दलीय राजकारणात सक्रीय भाग घेणार नाहीत. तसेच आपल्या समस्याच्या संबंधात राजकीय पक्ष, कार्यकर्ते आणि वर्तमानपत्रे यांचे सहकार्य घेणार नाहीत.

8) परीक्षा किंवा त्या संबंधात अनुचित प्रकारे फायदा घेणे किंवा अनुचित साधनांचा प्रयोग करणे गंभीर दुराचरण मानले जाईल.

9) विद्यार्थ्यांनी शिस्त आणि संयम राखणे आवश्यक आहे. महाविद्यालयाची किर्ती आणि प्रतिष्ठेला नुकसानकारक होईल असे कोणतेही कार्य विद्यार्थ्यांनी करु नये.

10) महाविद्यालयीन संपत्ती, विशेषतः विजेचे सामान, फर्निचर, प्रयोगशाळा, उपकक्ष, उपकरण इत्यादींच्या मोडतोडीची नुकसान भरपाई म्हणून विद्यार्थ्यांकडून सामान्य अर्थदंड वसूल केल्या जाईल.

11) विद्यार्थ्यांच्या या साधारण आचार संहितेचा भंग करणाऱ्या दोषी व्यक्तीला उचित दंड देण्यासाठी विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे. जेणेकरुन महाविद्यालयाचे प्राथमिक कार्य अध्ययन, शांतता आणि मनोयोगाने चालू शकेल.